३

१० प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** तडकलास **Year (वर्ष):** 2024

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0039 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/02/2024 01:18 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 26/02/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2024

**Time From (वेळेपासून):** 15:47 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:47 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/02/2024 **Time (वेळ):** 00:54 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/02/2024 00:54 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 25 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** प्रादेशिक परिवहन कार्यालय परभण, परमणी जि परभणी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सुरज गंगाधर अहिरे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2000 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सारंग नगर, परभणी,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सारंग नगर, परभणी,मोधा,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8830459896

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणेश दामोधर टाक | | | 1. वरिष्ठ लिपिक, प्रादेशिक परिवहन,कषी सारथी कलनी, ,गांधी विद्यालया जवळ, वसमत रोड ,मोधा,परभणी,महाराष्ट्र, भारत |
| 2 | मोहम्मद मसुद मोहम्मद अब्दुल रशीद | | | 1. शाही मस्जीद जवळ,गाडिवान मोहल्ला, स्टेशन रोड ,परभणी,नानलपेठ,परभणी, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 27.02.2024. फिर्याद मी सुरज गंगाधर अहिरे वय 24 वर्ष व्यवसाय शिक्षण रा.सारंग नगर, परभणी ता.जि.परभणी मोबाईल क्रमांक 8830459896.समक्ष न्टी करप्शन ब्युरो परभणी येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 22.02.2024 रोजी न्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन लेखी तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन सध्या छत्रपती संभाजीनगर येथे बी.ए. चे शिक्षण घेत आहे.मी कानठक टुर्स ण्ड ट्रावेल्स या नावाने शप क्ट लायसन्स काढुन आर.टी.ओ. कार्यालयाचा कच्चा परवाना काढण्यासाठी दिनांक 13.02.2024 रोजी आर.टी.ओ. कार्यालय परभणी येथे गेलो असता तेथील क्लार्क टाक व खाजगी इसम मोहम्मद मसुद यांनी मला आर.टी.ओ. कार्यालयाचा कच्चा परवाना काढुन देण्यासाठी 3000/-रुपयाची मागणी केली.तसेच मी दिनकर रामभाऊ भांबळे रा.जिंतुर यांचे कडुन टाटा कंपनीची इंडिका डीएलएस पासिंग क्रमांक एमएच 37 ए 3497 ही गाडी विकत घेऊन गाडी नावावर करण्यासाठी ऑनलाईन अर्ज करुन आर.टी.ओ. कार्यालय परभणी येथे जावुन क्लार्क कऱ्हाळे यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला गाडी नावावर करुन देण्यासाठी 1500/-रुपयाची मागणी केली.आर.टी.ओ. कार्यालयातील क्लार्क टाक, कऱ्हाळे व खाजगी इसम मोहम्मद मसुद यांनी मागीतलेले पैसे हे लाचेचे आहे हे मला माहिती असल्याने मी दिनांक 20.02.2024 रोजी न्टी करप्शन ब्युरो मुंबई येथे जावुन मा.वरिष्ठ अधिकारी यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला न्टी करप्शन ब्युरो जालना येथे श्री.किरण बिडवे पोलीस उपअधीक्षक यांच्या कडे तक्रार देण्याचे सांगितले. त्यावरुन मी आज रोजी न्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी हजर आलो आहे. मला आर.टी.ओ. कार्यालयातील क्लार्क टाक, कऱ्हाळे व खाजगी इसम मोहम्मद मसुद यांना पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना पैसे दिले नाही तर ते मला कच्चा परवाना देणार नाही. मी आज दिनांक 22.02.2024 रोजी आर.टी. ओ. कार्यालय परभणी येथे जावून क्लार्क टाक, कऱ्हाळे व खाजगी इसम मोहम्मद मसुद यांची भेट घेऊन त्यांचे सोबत माझ्या कामाविषयी बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची लेखी तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन न्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे

साहेब यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. मी दिलेल्या लेखी तक्रारीवर मी, पंचानी व श्री.बिडवे साहेब यांनी सह्या केल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेब, दोन्ही पंच, सापळा पथक हे खाजगी वाहनाने व मी माझ्या मोटार सायकलने न्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयातुन निघुन कृषी विद्यापीठ परभणी येथे सुरक्षित ठिकाणी थांबलो.मी प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथील क्लार्क टाक, कऱ्हाळे व खाजगी इसम मोहम्मद मसुद यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी दिनांक 22.02.2024 रोजी लाचेची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी खाजगी वाहनात श्री.बिडवे साहेबांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेब यांचे वक्तव्य घेऊन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात व्हाईस रेकर्डर मशीन अडकवण्यात आली. त्यानंतर मी पंच क्र.1 पंकज ढाकरे यांचे सोबत क्लार्क टाक, कऱ्हाळे व खाजगी इसम मोहम्मद मसुद यांना भेटण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथे माझ्या मोटार सायकलवर गेलो. तेंव्हा क्लार्क कऱ्हाळे हे रजेवर असल्याचे कळाल्याने मी क्लार्क टाक यांचा हस्तक खाजगी इसम मोहम्मद मसुद यांची भेट घेतली. त्यावेळी माझी व खाजगी इसम मोहम्मद मसुद यांचेत आपसात कामासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी मोहम्मद मसुद यांनी पंच क्र.1 ढाकरे यांचे समक्ष आर.टी.ओ. कार्यालयाचा कच्चा परवाना देण्यासाठी तीन हजार रुपये दे असे म्हणाले. त्यावर मी क्लार्क टाक यांना भेटुन टाक साहेब याच्या मध्ये दोनशे तीनशे कमी लावाना हे माझ वैयक्तिक हे असे म्हणालो असता क्लार्क टाक यांनी पंच क्र.1 ढाकरे यांचे समक्ष दोन तीनशे कमी करु, देऊन टाक असे सांगितले. त्यावरुन मी व पंच क्र.1 ढाकरे असे आम्ही कृषी विद्यापीठ परभणी येथे परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकर्डर श्री.बिडवे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री. घायवट यांनी बंद केला. व्हाईस रेकर्डर मध्ये रेकर्ड झालेले संभाषण श्री.बिडवे साहेबांनी माझ्या व पंचा समक्ष ऐकले. त्यामध्ये मोहम्मद मसुद यांनी पंचा समक्ष आर.टी.ओ. कार्यालयाचा कच्चा परवाना काढुन देण्यासाठी 3,000/-रुपये लाचेची मागणी करुन क्लार्क टाक यांनी लाच स्विकारण्यास संमती दिली असल्याचे निष्पन्न झाले. दिनांक 22.02.2024 रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथील क्लार्क कऱ्हाळे हे रजेवर असुन ते दिनांक 26.02.2024 रोजी रजेवरुन परत येणार असल्याने दिनांक 26.02.2024 रोजी क्लार्क कऱ्हाळे यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा केला. दिनांक 26.04.2024 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेब, दोन्ही पंच, सापळा पथक हे खाजगी वाहनाने मौजे असोला शिवारात सुरक्षित ठिकाणी येऊन थांबले. सदर ठिकाणी मी माझ्या मोटार साकयलवर आलो. प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथील क्लार्क कऱ्हाळे यांची लाचेची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी खाजगी वाहनात श्री.बिडवे साहेबांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेब यांचे वक्तव्य घेऊन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात व्हाईस रेकर्डर मशीन अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 ढाकरे यांचे सोबत क्लार्क कऱ्हाळे यांना भेटण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 ढाकरे असे आम्ही प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथे जाऊन क्लार्क कऱ्हाळे यांची भेट घेतली. त्यावेळी क्लार्क कऱ्हाळे यांनी पंच क्र.1 ढाकरे यांचे समक्ष गाडी नावावर करण्यासाठी लाचेची मागणी न केल्याने मी व पंच क्र.1 ढाकरे असे आम्ही मौजे असोला शिवारात सुरक्षित ठिकाणी परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकर्डर श्री.बिडवे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकर्डर श्री. बिडवे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला. व्हाईस रेकर्डर मध्ये रेकर्ड झालेले संभाषण श्री.बिडवे साहेबांनी माझ्या व पंचा समक्ष ऐकले. त्यामध्ये क्लार्क कऱ्हाळे यांनी पंचा समक्ष गाडी नावावर करण्यासाठी लाचेची मागणी न केल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा केला.त्यानंतर दिनांक 22.02.2024 रोजी झालेल्या लाच मागणी प्रकरणात क्लार्क टाक व खाजगी इसम मोहम्मद मसुद यांचे विरुध्द प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथे सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांच्या सूचने वरुन खाजगी वाहनात पोलीस अंमलदार लहाने यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविले. क्लार्क टाक व मोहम्मद मसुद यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील उपलब्ध असलेले पाचशे रुपये दराच्या 04 नोटा एकुण 2,000/- रुपये रक्कमेला थ्रासीन पावडर लावली. सदरील थ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवल्या. श्री.बिडवे साहेबांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन क्लार्क टाक व मोहम्मद मसुद यांनी लाच स्विकारल्या नंतर कार्यालयाच्या आवारात सापळा पथकास दिसेल अश्या ठिकाणाहुन डोळ्यावर गगल लावुन इशारा करणे बाबत मला सूचना दिली. तसेच सापळा टिम मधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सूचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार लहाने यांना सापळा पथकातुन वगळुन खाजगी वाहनात थांबण्याची सुचना दिली. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात व्हाईस रेकर्डर मशीन अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 ढाकरे यांचे सोबत क्लार्क टाक व मोहम्मद मसुद यांना भेटण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथे पाठविले. मी व पंच क्र.1 ढाकरे असे आम्ही माझ्या मोटार सायकलने प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथे गेलो. माझ्या पाठीमागे श्री.बिडवे साहेब हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 लकडे यांचे सह खाजगी वाहनाने प्रादेशिक परिवहन कार्यालय परभणी येथे आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने परिसरात सापळा लावून थांबले. त्यानंतर मी व पंच क्र.1 ढाकरे असे आम्ही क्लार्क टाक व मोहम्मद मसुद यांना भेटण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या बाहेरुन खिडकी क्रमांक 13 मध्ये गेलो. त्याठिकाणी आमचे कामा संबंधी बरीच चर्चा झाली. तेंव्हा आमचे बोलणे चालु असतांना पंच क्र.1 ढाकरे यांचे समक्ष मोहम्मद मसुद यांनी दोन हजार असे विचारले असता मी त्यांना दोन हजार का, हम्म हे असे म्हणुन मी माझ्या उजव्या हाताने पन्टच्या समोरील उजव्या खिश्यातुन न्थ्रासिन पावडर लावलेले लाचेचे 2000/- रुपये काढुन मोहम्मद मसुद हयांचे समोर धरले असता त्यांनी त्यांचे उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून दोन्ही हाताने मोजुन त्यांच्या पन्टच्या उजव्या खिश्यात ठेवले. त्यानंतर मी माझ्या जवळील कागदपत्र मोहम्मद मसुद यांच्या कडे दिले. त्यानंतर थोडया वेळाने मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्वनियोजित इशारा केला. ती वेळ अंदाजे दुपारी पावणे तीन वाजेच्या सुमारास होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्रं.2 लकडे यांचे सह त्या ठिकाणी आले. पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार घायवट यांनी माझ्या कडील व्हाईस रेकर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर श्री.बिडवे साहेयांनी पंच क्र.1 ढाकरे यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 ढाकरे यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमाकडे अंगुली निर्देश करुन यांनी तक्रारदार यांच्या कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन त्यांच्या पन्टच्या समोरील उजव्या खिश्यात ठेवली आहे असे सांगितल्याने मोहम्मद मसुद यांना पंचा समक्ष 2000/-रुपये लाचेच्या रकमेसह जागेवर पकडले. तरोच पंच क्र.1 यांनी सदर खोलीतील पांढरे शर्ट घातलेल्या इसमाकडे अंगुली निर्देश करुन हे क्लार्क टाक असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर क्लार्क टाक व मोहम्मद मसुद यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अनुक्रमे 1.गणेश दामोधर टाक वय 39 वर्ष

5



व्यवसाय नोकरी वरिष्ठ लिपिक, प्रादेशिक परिवहन कार्यालय परमणी रा.कृषी सारथी कलनी, गांधी विद्यालया जवळ, वसमत रोड परभणी व 2. मोहम्मद मसुद मोहम्मद अब्दुल रशीद वय 51 वर्षे व्यवसाय रा.शाही मस्जीद जवळ, गाडिवान मोहल्ला, स्टेशन रोड परभणी असेसांगितले CCTNSप्रणाली मध्ये शब्द मर्यादा असल्याने फिर्याद या सोबत जोडुन वेगळी सादर केली आहे

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the Investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** kapil punjaram shelke(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Sibey.

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** kapil punjaram shelke
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

PSI

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. ताडकळस
ता.पूर्णा जि.परभणी